

# इलेक्शनचा नाद खुळा





## आजपासून MISSION CORPORTION

### महिला आरक्षणाची आज फुटणार बंपर लॉटरी; रणरागिणींच्या नशिबाचा फैसला, देव पाण्यात!

सोलापूर : बहुप्रतिक्षीत अन् चर्चित सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी महिलांच्या आरक्षणाची आज बंपर लॉटरी निघणार आहे. येथील हुतात्मा स्मृती मंदिरात सकाळी साडेनऊ वाजता आरक्षण सोडतीचा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. शहरातील २६ प्रभागांसाठी हे आरक्षण काढण्यात येणार आहे.





यामध्ये निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या कोणकोणत्या रणरागिणींचं नशिब फळाला येणार याचा फैसला आज होणार आहे. मेंबर म्हणून इंद्रभुवन म्हणजेच महानगरपालिकेत एंट्री होण्याच्या आरक्षणाच्या पहिल्या परीक्षेचा पेपर होत आहे. प्रभागातील आरक्षण आपल्या बाजूनं पडावं म्हणून काही अतिउत्साही रणरागिणींनी देव पाण्यात घालून ठेवल्याचे सांगण्यात आले.




## ढोबळे परिवाराचा 'ढोबळ'मानाने शरद पवार पक्षात वाढला प्रभाव

पक्षाच्या वळचणीला अनेक दिवस थांबूनदेखील भाजपनं कानाडोळा केलेल्या मंगळवेढ्याच्या ढोबळे परिवाराचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रभाव वाढत असल्याचं 'ढोबळ' मानानं मानलं जातंय. त्याला कारणदेखील तसंच सांगितलं जातंय. या प्रक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदावर माजी मंत्री लक्ष्मण ढोबळेंना यापूर्वीच संधी देण्यात आली आहे. त्यानंतर आता बहुजन रयत परिषदेच्या महिला आघाडीच्या प्रमुख आणि लक्ष्मण ढोबळें/च्या कन्या कोमल ढोबळे-साळुंखे यांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदावर संधी देण्यात आली आहे. पिता-कन्येला प्रदेशस्तरावरील पदं देण्यात आल्यानं या पक्षात त्यांचा प्रभाव वाढल्याचं मानलं जात असलं तरी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची क्रेझ काय? हा मुद्दादेखील उपस्थित केला जातोय. अडचणीत असलेल्या पक्षाला गरज म्हणून ढोबळे पिता-कन्येला पक्षात घेऊन पदं देण्यात आली की त्यांच्या या पक्षात खरोखर प्रभाव वाढतोय... सच क्या...झूठ क्या? आप जानो.





## युती नही, खुदही लढेंगे हम..!

### 'हम है राही अजितदादा के'; 'अब की बार ५० पार'चा निर्धार

सोलापूर : ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल यांनी केलेला प्रवेश आणि त्या अनुषंगिक कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेलं नवचैतन्य सोमवारी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत दिसंल. होऊ घातलेली सोलापूर महापालिकेची निवडणूक स्व:बळावर लढताच अजित पवार राष्ट्रवादीवाल्यांनी 'अब की बार ५० पार'चा नारा देत सोलापूर महापालिका निवडणुकीचं रणशिंग फुंकलं.

सोलापूर महापालिकेवर सत्ता आणण्यासाठी यापूर्वी राष्ट्रवादीने जाणीवपूर्वक प्रयत्न केले. मात्र हा पक्ष इथल्या सत्तेत येऊ शकला नाही. मात्र आता अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसनं पुन्हा एकदा महानगरपालिकेतील सत्तेसाठी कंबर कसत 'अब की बार ५० पार'चार नारा दिला आहे.



# भाजप जोमानं अघाडी दमानं!



'गटतट' नो; ओन्ली 'भाजप अन् कमळ'

सोलापूर : पश्चिम महाराष्ट्रातील राजकारणाचं मोठं केंद्र, सहकार पंढरी सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्तेची केंद्र काबीज करण्यासाठी भाजपनं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरेंच्या झंझावाती फिल्डींगची रणनिती आखून तशी अमंलबजावणी सुरु केली आहे. नामदार गोरेंना देवाभाऊंचे निकटवर्तीय माजी आमदार राम सातपुते आणि अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टींचे धडाकेबाज साथ मिळत आहे.

धुमशान

सोलापूर जिल्ह्यातील ११ नगरपरिषद आणि अनगर नगरपंचायत निवडणुकींचं रणांगण जिंकण्याच्या पार्श्वभूमीवर, पालकमंत्री गोरेंचा जिल्ह्यात अकलूज टू अक्कलकोट व्हाया पंढरपूर असा झंझावात सुरु आहे. विशेषत्वे, या निवडणुकांमध्ये गटबाजीला पूर्णपणे उखडून काढत 'भाजप आणि कमळ' हेच लक्षवेधी सुत्र या पक्षांनी पर्यायानं ना.गोरेंनी ठेवलं आहे.जिल्ह्यातील निमशहरांच्या १२ ठिकाणी भाजप स्व:बळवर 'अकले हम' नारा देत निवडणूक लढवत आहे. इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींनी वातावरण ढवळून काढलं आहे.

## 'अकलूज टू अक्कलकोट व्हाया पंढरपूर' जयाभाऊंचा झंझावात; रामभाऊ अन् सचिनदादांची साथ

### 'मानो' या न 'मानो' फिरभी परिचारक अन् मंगळवेढ्याचे आमदारांचे हातात हात

भाजपनं गटबाजी रोखत सर्वांना निवडणुकांच्या प्लॅटफार्मवर एकत्र आणलं आहे. माजी आमदार प्रशांत परिचारक आणि मंगळवेढ्याच्या भाजप आमदाराचे पटत नाही. 'आतून' शीतयुद्ध सुरु आहे. तरीपण पंढरपूर आणि मंगळवेढ्याच्या नगरपरिषद निवडणुकांसह या दोन्ही तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी दोघांना कामाला लावलं आहे. निवडणुकांसाठी न पटणाऱ्या दोघांचे हात एकमेकांच्या हातात आले आहेत.

### अकलूजच्या कार्यकर्त्यांमध्ये आली जान

अकलूज नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, पालकमंत्री गोरे यांनी येथे जाऊन इच्छुकांच्या मुलाखती घेत, कोण्याच्या दबावाला बळी न पडता निवडणूक पार पाडावी. कार्यकर्त्यांना भाजपकडून बळ दिले जात आहे. त्यामुळे कोणी दबावाखी काम करु नये, असा विश्वास दिला. त्यामुळं इथल्या पदाधिकरी, कार्यर्त्यांमध्ये जान आली.

# आता थांबायचं न्हाय रं गड्या थांबायचं न्हाय!

**११ नगरपरिषदांसह अनगर नगरपंचायत निवडणुकीचं धूमशान सुरु!!**

सोलापूर : येत्या २ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील ११ नगरपरिषदेसह मोहोळ तालुक्यातील अनगर नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी सोमवार (ता.१०) पासून निवडणुकींचं धूमशान सुरु झालं आहे. प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज भरण्याला कालपासून सुरुवात झाली आहे. उमेदवारी अर्ज भरण्यातून खऱ्या अर्थानं निवडणुकीच्या तयारी सुरुवात झाली आहे. विविध राजकिय पक्ष, गटतट, नेते, पुढारी, प्रमुख कार्यकर्ते, इच्छुक उमेदवारांसह निवडणूक प्रशासन चांगलंच कामाला लागलं आहे.'आता थांबायचं न्हाय रं गड्या थांबायचं न्हाय!' असंचं चित्र त्यांच्यामध्ये दिसतंय.

### 'या' ठिकाणी निवडणुकीचा आखाडा

नगरपरिषद : बार्शी, पंढरपूर, अक्कलकोट, मैंदर्गी, करमाळा, कुर्डुवाडी, मंगळवेढा, सांगोला, मोहोळ आणि अकलूज.

नगरपंचायत : अनगर

### दृष्टीक्षेपात आकडेवारी...

- निवडणुकीच्या १२ ठिकाणी १५२ प्रभाग
- एकूण २८९ जागांसाठी होणार मतदान
- एकूण ४ लाख ४३ हजार ६०५ मतदार बजावण मतदानाचा हक्क
- बार्शीत सर्वाधिक २१ प्रभाग आणि ४२ सदस्यांच्या जागा
- दुधनीत सर्वात कमी १० प्रभागात २० जागा
- १२ ठिकाणच्या मतदान प्रक्रियेसाठी १५२ मतदान केंद्र





### झिंग झिंग झिंगाट...

युतीत आणि आघाडीत, सारखाच गुंता आहे! धनुष्याला बाणाची, कमळाच्या पाकळ्यांची, हाताला बोटांची आणि घड्याळाला काट्यांची निवडणुकीत चिंता आहे!

# भाई-बहन का क्या होगा फैसला?

सोलापूर/प्रतिनिधी



तिरंगी लढतीचं दिसेल धूमशान

करमाळा नगरपरिषदेची निवडणूक कशी लढली जाणार? या संदर्भात शहरवासियांसह तालुक्यात मोठे औत्सुक्य आहे. दरम्यान बागल गटाचे नेते दिग्विजय बागल हे शिंदे शिवसेनेसोबत आहेत. तर नेत्या रश्मी बागल-कोलते या भाजपमध्ये आहेत. हे दोघे बहिण-भाऊ स्वतंत्र पक्षाचे काम करत असले तरी महायुतीमधील घटक पक्ष आहेत. नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी ते एकत्र येण्याचा निर्णय घेऊ शकतात. त्याशिवाय माजी आमदार संजयमामा शिंदे हे अजित पवार गटाशी सलग्न आहेत. बागल बहिण-भावाच्या भाजप-शिंदेसेनेतसोबत संजयमामा शिंदे हे आपल्या राष्ट्रवादीसह युती करुन शकतात. त्यातून बागल आणि शिंदे गट नगरपरिषदेच्या या निवडणुकीसाठी उदयास येऊ शकतो.

### जगताप, पाटील आणि चिवटे गट लढेल एकत्र

माजी आमदार जयंवतराव जगताप हे शिंदे शिवसेनेत आहेत. त्याशिवाय महेश चिवटे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे निकटवर्तीय आहेत. त्यामुळे नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी जगताप आणि चिवटे हे एकमेकांच्या हातात हात घालू शकतात. त्याशिवाय राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे विद्यमान आमदार हे जगताप आणि चिवटे गटासोबत आल्यास जगताप, पाटील आणि चिवटे असा गट निवडणुकीसाठी निर्माण होऊ शकतो.

### सावंत गटाची नगराध्यक्षपदावर नजर

माजी आमदार संजयमामा शिंदे समर्थक सावंत गट नगरपरिषदेच्या निवडणुकीत अग्रेसर आहे. या गटाची मुख्यत्वे, नगराध्यक्षपदावर नजर आहे. बागल– शिंदे त्याशिवाय जगताप–पाटील–चिवटे या दोन्ही गटांच्या विरुद्ध सावंत गट टक्कर देईल. तिरंगी लढत लागेल हे आता उघडपणे दिसत आहे.




# आघाडीतर्फे डॉ.प्रणिताचं नाव पुढं येताच; साधना भोसले भाजपाच्या मुलाखतीत!




सोलापूर : दक्षिणकाशी श्री क्षेत्र पंढरपूरच्या नगरपरिषदेची निवडणूक 'बिग फाईट' होणार हे आता उघड झालं आहे. नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीवरुन हे स्पष्ट होत आहे. नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीवरुन इथं सर्वात मोठा ट्विस्ट समोर आला आहे. नगराध्यक्षपदासाठी विठ्ठल परिवार अर्थात सर्वपक्षीय आघाडीकडून त्यातही राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून डॉ,प्रणिता भालके यांची उमेदवारी निश्चित असल्याचं समोर येताच, नागेश भोसले गटानं वेगळ्या हालचाली करुन माजी नगराध्यक्षा साधना भोसलेंना भाजपच्या उमेदवारीत उतरवलं.भाजपकडून भोसले गटाला उमेदवार मिळाल्यास डॉ.प्रणिता भालके विरुद्ध साधना भोसले अशी दूरंगी फाईट लागेल, असं सोमवार (ता.१०) चित्र निर्माण झालं.

नागेश भोसले हे तसे परिचारक गटाचे कट्टर. मात्र मागच्या काही महिन्यांत ते या गटापासून बाजूला झालेले. नगरपरिषद निवडणुकीच्या टप्प्यावर ते सर्वपक्षीय आघाडीच्या नेत्यांसमवेत होते. विठ्ठल परिवार पुरस्कृत सर्वपक्षीय आघाडीकडून पत्नी साधना यांना उमेदवारी मिळेल, असं त्यांना अपेक्षित असावं. मात्र या आघाडीकडून स्व.भारत भालकेंच्या सुनबाई प्रणिता यांचं नगराध्याक्षपदाच्या उमदेवारीसाठी नाव जवळपास निश्चित झाल्याचं कळल्यानंतर भोसले गटानं आपला नूर बदलला. साधना भोसलेंना भाजपच्या मुलाखतीत उतरवलं. परिचारक गटाच्या माध्यमातून भोसलेंना तब्बल साडेसात वर्षे नगराध्यक्ष पद भूषवता आलं.

## विठु नगरीत इजा-बिजा



### विठुनगरीत भाजप विरुद्ध आघाडी खडाखडी सामना

'अकेले हम'चा नारा दिलेल्या भाजपचा परिचारकांच्या नेतृत्वाखालील पांडूरंग परिवाराला सोबत घेऊन सर्वपक्षीय आघाडीविरुद्ध लढत देण्याचा व्होरा ठरवल्याचं स्पष्ट होतं. याच अनुषंगाने, पक्षाच्यावतीने सोमवार (ता.१०) पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हाध्यक्ष शशिकांत शिंदे आदींच्या उपस्थितीत मुलाखती झाल्या.